महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे
महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यालय इमारत
(दुसरा व चौथामजला) सर्व्हे नं. ८३२ ए, भांबुर्डा, शिवाजीनगर,पुणे ४११००४
दूरध्वनी क्र. :- 020 - 29709617 वेबसाइट :-mscepune.in ई-मेल :-mscegcctbc@gmail.com

**परीक्षा प्राधान्य**

**महत्वाचे**

जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/२०२६/ 8829

दिनांक :- ०६/१०/२०२६.

# प्रसिध्दीपत्र

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचे मार्फत शासकीय संगणक टंकलेखन प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) जुलै - २०२६ ची पुनर्परीक्षा ऑक्टोबर -२०२६ दि. १२/१०/२०२६ ते दि. १५/१०/२०२६ या कालावधीत (दि.१६ व १७ ऑक्टोंबर २०२६ हे दोन दिवस राखीव) एकूण ६३ परीक्षा केंद्रांवर घेण्यात येणार आहे.

सदर परीक्षेतील विद्यार्थ्यांचे प्रवेशपत्र परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर संस्था लॉगीनव्दारे दि.०६/१०/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात येत आहे.

संबंधित संगणक टंकलेखन संस्थाचालकांनी त्यांच्या संस्थेतील सर्व परिक्षार्थ्यांची प्रवेशपत्रे संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन शिक्का व स्वाक्षरीसह संबंधित परीक्षार्थ्यांना वितरीत करण्याची व्यवस्था करावी.

सर्व परीक्षार्थ्यांनी त्यांची ऑनलाईन प्रवेशपत्रे आपल्या संगणक टंकलेखन संस्थेतून परीक्षेपूर्वी हस्तगत करावित.

6/10/26

**(नंदकुमार बेडसे- भा.प्र.से)**
**अध्यक्ष,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे -०४.**

**दि. ०६/१०/२०२६.**
**स्थळ : पुणे.**